Ram

THE HISTORY

OF

ANTIOCHUS EPIPHANES

OR THE

INSTITUTION

OF THE

FEAST OF DEDICATION

מגילת אנטיוכוס

आनतिओखोस राजाचा इतिहास

अथवा

हान्नुक्याचे सनाची स्थापना.

THE HISTORY

OF

ANTIOCHUS EPIPHANES

OR THE

INSTITUTION

OF THE

FEAST OF DEDICATION

TRANSLATED

FROM HEBREW INTO MARATHI

BY

JOSEPH EZEKIEL RAJPURKER

TEACHER IN DAVID SASSOON'S BENEVOLENT INSTITUTION

AND

SECRETARY TO THE BENE-ISRAEL IMPROVEMENT SOCIETY

PUBLISHED BY THE BENE-ISRAEL IMPROVEMENT SOCIETY

BOMBAY:

PRINTED AT GUNPUT CRUSHNAJI'S PRESS.

1866-5626.

Price 2 Annas.

מגילת אנטיוכוס

आनतिओखोस राजाचा

इतिहास,

अथवा

हान्नुक्याचे सनाची स्थापना.

या ग्रंथाचें

इब्री मूळ ग्रंथावरून मराठी भाषेंत

योसेफ येहेजकेल राजपुरकर

दाविद सासोन यांच्या शाळेंतील शिक्षक;

व

इस्राएल लोकांच्या सद्गुण शोधक मंडळीचे चिटणीस

यांणीं

भाषांतर केलें

तें

इस्रायल लोकांच्या सद्गुण शोधक मंडळीनें लोकोपयोगाकरितां

मुंबईमध्यें

गणपत कृष्णाजी यांच्या छापखान्यांत छापविलें.

इ. स. १८६६.

इस्रायली ५६२६.

किंमत २ आणे.

प्रस्तावना.

ईश्वराची दया इस्राएल लोकांवर पूर्ण आहे, हें शास्त्रावरूनच दिसून येतें असें नाहीं; परंतु त्यांबरोबरचे दुसरे लोक नाहींसे होत असतां, ते मोठमोठ्या विघ्नांतून बांचून आजपर्यंत राहिले आहेत, यावरूनहि उघडपणें दिसून येतें. फारो, हामान व दुसरे कित्येकांनी इस्राएलांचें नाव जगांतून नाहींसें करावें असें योजिलें होतें; परंतु त्यांचाच नाश होऊन यांस कांहींच अपाय झाला नाहीं. याप्रमाणें दुसरें पवित्र मंदिर बांधलें जाईपर्यंत ईश्वरानें जे चमत्कार इस्राएलांसाठीं केले, ते सर्व पवित्र शास्त्रांत लिहिलेले आहे. त्यानंतरचा त्यांचा वृत्तांत शास्त्रांत नाहीं; परंतु इस्राएलांतील व अन्य लोकांतील ग्रंथकारांनींहि लिहून ठेविला आहे. यावान म्हणजे ग्रीक लोकांचा राजा आनतिओखोस यानें इस्राएलांचें नाव व त्यांचा धर्म जगांतून नाहींसा करावा असें योजिलें होतें; परंतु त्यांतूनही त्यांस सोडविलें. याचा वृत्तांत शास्त्रांत नाहीं, परंतु इतिहासांत सांपडतो. या तारणाची इस्राएलांस सर्वकाळ आठवण राहावी म्हणून हान्नुका हा सन नेमिला आहे. यास्तव आजच ईश्वरानी आपणास ह्या संकटांतून सोडविलें असें समजून आणि त्याचे थोर उपकार मानून हा सन पाळावा.

आनतिओखोस राजाचा इतिहास,

अथवा

हान्नुक्याचे सनाची स्थापना.

यावानांचा राजा आनतिओखोस, जो मोठा बळवान आणि आपले राज्यांत शूर होता, आणि ज्याचे हुकुमांत सर्व राजे होते; त्याच्या दिवसांत असें झालें कीं, त्यानें पुष्कळ नगरें व बळवान राजे जिंकून त्यांचे कोट मोडिले, नासिले, त्यांचे वाडे जाळिले आणि त्यांच्या लोकांस बंदांत ठेविलें. मग त्यानें आपणा करितां राजधानीसाठीं समुद्राच्या किनाऱ्यावर एक मोठें नगर बांधून आपल्या नामाप्रमाणें त्यास आनतिओख असें नांव दिल्हें. त्याचा प्रधान बगरीस यानेंहि त्या नगरासमोर दुसरें नगर बांधून आपल्या नावांप्रमाणें त्यास बगरीस असें नाव दिल्हें; आणि हीं त्यांचीं नावें आजपर्यंत आहेत. त्याच्या राज्याच्या तेविसावे वर्षी, म्हणजे देवाचें मंदिर बांधल्यानंतर दोनशें तेराव्या वर्षी, येरुशालेमेवर चढून जाण्याचा बेत त्यानें केला. आणि तो आपल्या सरदारांस म्हणाला कीं, आपल्या राज्यांत येरुशालेमे मध्यें येहुदी लोक आहेत; हें तुम्ही जाणत नाहीं

काय ? ते आपल्या देवांस अर्पण करीत नाहीं; आपल्या धर्मास अनुसरत नाहीं; आणि राजाचे नेम सोडून आपल्याच नेमाप्रमाणें वागतात. आणि राजांच्या व अधिकाऱ्यांच्या नाशाची वाट पाहून; आमचा राजा आम्हावर केव्हां राज्य करील! देशांवर आणि समुद्रावर आमचा अधिकार केव्हां चालेल ! आणि सर्व पृथ्वी आमच्या हातीं केव्हां येईल ! असें ते म्हणतात. तर त्यांस जगांत राहू देणे हें (आपल्या) राज्यास भूषण नाहीं. यास्तव आतां चला, आपण त्यांवर चढून जाऊ आणि त्यांच्या देवानें त्यां बरोबर केलेले शाब्बाथ, प्रतिपदा आणि सुंता, हे करार आपण रद्द करूं. ही गोष्ट त्याच्या सरदारांच्या व त्याच्या सर्व सैन्याच्या दिसण्यांत चांगली दिसून आली. तेव्हां आनतिओखोसानें आपला प्रधान नीकानोर यास, मोठें सैन्य व पुष्कळ लोक त्या बरोबर देऊन येहुद्यांचें नगर येरुशालेम, याजवर पाठविलें. तेथें त्यानें मोठा वध करून पवित्र मंदिरांत अन्यदेवांचें उंच स्थान बांधिलें; आणि इस्राएलांच्या देवानें आपले सेवक भविष्यवादी यांस सांगितलें होतें कीं, मी तेथें आपला शेखिना सर्वकाळ ठेवीन; त्या ठिकाणीं त्यांनीं डुकर कापून त्याचें रक्त पवित्र अंगणांत आणिलें.

मग मतातयाचा पुत्र योहानान मुख्ययाजक यानें असें घडून आलें हें जेव्हां ऐकिलें; तेव्हां तो क्रोधानें संतप्त होऊन त्याच्या तोंडाचें तेज पालटलें, आणि या विषयीं काय करावें याचा विचार करूं लागला. तेव्हां त्यानें आपणाकरितां दोन हात लांब आणि एक वीत रुंद असी तरवार

करून आपल्या वस्त्राखालीं लपवून ठेविलीं. आणि येरुशालेमांस येऊन राजाच्या दारापुढें उभा राहिला, आणि द्वारपाळांस बोलावून त्यांस म्हणाला कीं, मी मतातयाचा पुत्र योहानान राजापुढें जावयास आलों आहें. तेव्हां ते द्वारपाळ आणि पाहरेकरी येऊन त्यास म्हणाले कीं, येहुद्यांचा मुख्य याजक दाराजवळ उभा आहे. तेव्हां नीकानोर म्हणाला कीं त्यास येऊंद्या. मग ते योहानानास नीकानोरापुढें घेऊन आले. तेव्हां नीकानोर योहानानास म्हणाला कीं, ज्यांनीं राजावर बंडावा केला, आणि जे त्याच्या राज्याचें कल्याण इच्छित नाहींत, त्यांतील तूं एक आहेस. योहानान त्यास उत्तर करून म्हणाला हे स्वामी, मी तोच; परंतु आतां मी तुजपुढें आलों आहें; जसी तुझी इच्छा असेल तसें मी करीन. तेव्हां नीकानोर त्यास म्हणाला कीं, जर तूं माझ्या इच्छेप्रमाणें करणार, तर एक डुकर घेऊन त्या उंचस्थानावर काप; म्हणजे राजकीय वस्त्रें तुला लेववून व राजाच्या घोड्यावर तुझी स्वारी काढून राजाच्या प्रियकरांतला तूं एक होशील. हें जेव्हां योहानानानें ऐकिलें, तेव्हां तो त्यास उत्तर देऊन म्हणाला, हे स्वामी, मी इस्राएल लोकांस भितों; त्यांनीं कदाचित हें ऐकिलें तर ते मला धोंडमार करून मारून टाकितील. ही गोष्ट त्यांस कदाचित कळेल, म्हणून तुझ्या समोरचीं सर्व मनुष्यें घालीव. यावरून निकानोरानें त्याच्या समोरचीं सर्व मनुष्यें घालविलीं. तेव्हां मतातयाचा पुत्र योहानान यानें आपले डोळे आकाशाकडे उंचावून आपल्या देवास प्रार्थना केली. आणि म्हणाला —हे माझ्या देवा, आणि माझे पूर्वज आब्राहाम, इसहाक व याकोब यांच्या देवा,

आतां मी विनंती करितों कीं, या निर्सुंन्याचे हातीं मला देवूं नको. कारण जर त्यानें मला मारिलें तर तो आपल्या देवाच्या देउळांत जाऊन त्याची स्तुति करील आणि म्हणेल कीं, माझ्या देवानें त्यास माझ्या हातीं दिल्हें. त्यावेळीं त्यानें त्यावर तीन पाउलें चालून जाऊन ती तरवार त्याच्या उरांत भोंसकली. आणि त्याचा मुडदा पवित्र अंगणांत आकाशाच्या देवापुढें पाडिला. मग योहानान पुनः उत्तर करून म्हणाला कीं, हे माझ्या देवा, मी त्यास पवित्र ठिकाणीं मारिला म्हणून, तें मजकडे पाप असें मोजूं नको. आणि आतां जे लोक त्याबरोबर येहुदास आणि येरुशालेमास पीडा करण्याकरितां आले आहेत, त्यांसहि तसेच माझे हातीं दे. मग मताततयाचा पुत्र योहानान यानें निघून त्यालोकां बरोबर लढाई केली, आणि त्यांचा मोठा वध केला. त्यादिवशीं इकडले व तिकडले जे मारले गेले त्यांची संख्या सात लक्ष बाहत्तर हजार. तिकडून परतल्यावर त्यानें आपल्या कीर्ती करितां एक खांब बांधून त्यास बळवानांस मारणारा माकाबी * असें नाव दिल्हें.

---

* माकाबी हा शब्द इब्री मध्यें מכבי असा आहे. हा शब्द " מי כמוך באלים יי " हे परमेश्वरा, देवांमध्यें तुजसारिखा कोण ? या वाक्याचा संक्षिप्त आहे. या शब्दांचीं पहिलीं अक्षरें एकत्र जोडून מכבי हा शब्द केला आहे. हीं अक्षरें त्यांच्या भावट्यावरही होतीं. तेव्हांपासून मताततयाचे कुटुंबास मकाबी असें नाव पडलें.

आणि असें झालें कीं, आनतिओखोस राजानें त्याचा प्रधान नीकानोर मारला गेला असें जेव्हां ऐकिलें; तेव्हां त्यास फारच दुःख झालें. मग त्यानें बगरीस, जो स्वतः दुष्ट असून आपल्या लोकांसहि (दुष्टांइकडे) वळवीत असे, त्यास बोलाविलें. आणि आनतीओखोस बगरीसास उत्तर करून म्हणाला कीं, इस्राएलांच्या पुत्रांनीं मजशीं काय केलें तें, त्यांनीं माझें सैन्य मारून, माझा तळ व माझे सरदारांस लुटिलें हें तूं जाणत नाहींस काय? व तूं ऐकिलें नाहींस काय? तर आतां तुम्हीं तुमच्या द्रव्याचा भरंवसा ठेऊं शकतां काय? आणि तुमचीं घरें तुमचीच असें म्हणूं शकतां काय? या आपण त्यांवर चढून जावूं आणि आकाशाचे देवानें त्यांसीं शाब्बाथ, प्रतिपदा आणि सुंता हे जे करार केलेले आहेत, ते आपण रद्द करूं. यावरून दुष्ट बगरीस व त्याचें सर्व सैन्य येरुशालेमास घेऊन तेथे त्यांनीं मोठा वध केला आणि शाब्बाथ, प्रतिपदा व सुंता हे करार न पाळावे असा त्यानें एक पूर्ण ठराव केला. ही राजाची गोष्ट अमलांत आल्यावर, आपल्या पुत्राची सुंता केली असा एक मनुष्य त्यांस सांपडला; तेव्हां त्यांनीं त्यास व त्याच्या बायकोस आणून त्या मुलाच्या समोर त्यांस फांशी दिल्हें. त्यावेळीं एका बाईस तिचा नवरा मेल्यावर पुत्र झाला, त्याची तिने आठव्या दिवशीं सुंता करून आपल्या पुत्रास हातावर घेऊन येरुशालेमेच्या तटावर चढली. आणि बगरीसास हाक मारून म्हणाली, हे दुष्ट बगरीसा, शाब्बाथ, प्रतिपदा व सुंता हे आमच्या पूर्वजांचे करार आम्ही कधींच रद्द करणार नाहीं व लेकरां-

घ्या लेकरांसहि ते उणे होणार नाहीं. (असें बोलून) तिने आपले मुलांस भूमीवर टाकिला आणि त्यामागून तिनेंही उडी टाकिली; आणि तीं दोघें एकदांच मरण पावलीं. त्या दिवसांत इस्राएलाच्या संतानांतून बहुतेकांनीं असें केलें; परंतु त्यांनीं आपल्या पूर्वजांचा करार पालटिला नाहीं.

त्यावेळीं इस्राएल लोक एकेकास म्हणूं लागले कीं, कदाचित शाब्बाथ विटाळेल म्हणून चला, आपण एका गुहेंत जाऊन विसांवा घेऊं. परंतु कोणे एकानें याची चाहाडी बगरीसा पुढें केली. तेव्हां दुष्ट बगरीसानें लढाऊ मनुष्यें पाठवून त्या गुहेंच्या तोंडाजवळ बसविलीं. तीं त्यांस म्हणालीं कीं, अहो येहुदी लोक, तुम्ही आह्मांकडे बाहेर या, आमची भाकर खा, आमचा द्राक्षरस प्या, आणि आमच्या कर्मा प्रमाणे तुम्हीं करा. तेव्हां इस्राएल लोक एक प्रत्येकास म्हणाले कीं, ज्या देवानें आपणास सीनाय डोंगरावर आज्ञा दिल्ही कीं, साहा दिवस उद्योग करून आपलें सर्व काम करा, आणि सातव्या दिवशीं तुम्ही विसावा घ्या; त्या परमेश्वर देवाचें आपण स्मरण करीत आहों. तर आतां, शाब्बाथ दिवस विटाळण्या पेक्षां आपण या गुहेंतच मरावें हें उत्तम. जेव्हां असें झालें, आणि ते त्यांकडे बाहेर आले नाहींत, तेव्हां त्यांनीं लांकडें आणून त्या गुहेंच्या तोंडाशीं जाळिलीं; त्यांत पुरुष व स्त्रिया मिळून सुमारें एक हजार मनुष्यें मेलीं. यानंतर मतातयाचा पुत्र योहानान व त्याचे चौघे भाऊ निघाले, आणि त्यांनीं त्यालोकांबरोबर लढून त्यांचा मोठा वध केला; कारण

त्यांनीं आकाशाच्या देवावर भरंवसा ठेविला होता. तेव्हां दुष्ट बगरीस एका तारवावर चढून आनतिओखोस राजाकडे पळून गेला; आणि जे तरवारेपासून वांचले तेहि त्याबरोबर गेले. तिकडे गेल्यावर बगरीस, आनतिओखोस राजास उत्तर करून म्हणाला कीं, हे राजा, येहुद्यांतून शाब्बाथ, प्रतिपदा व सुंता हीं रद्द करायास तूं आज्ञा दिल्ही होतीस; परंतु त्यामुळें दगा व मोठा बंडावा झाला. जरी सर्व लोक व राष्ट्रें गेलीं, तरी मतातयाचे पांच पुत्रांपुढें त्यांचे कांहींच चालायाचें नाहीं. ते सिहा पेक्षां बलकट, गरुडापेक्षां हलके, आणि आस्वला पेक्षां चपळ आहेत. तर आतां थोडक्या मनुष्यांनी तूं लढूं नको, जर त्यांसी लढशील तर राजा पुढें तूं लज्जित होशील; हें माझें मत्त तुला चांगलें आहे. यास्तव सर्व सैन्याच्या सरदारांनीं यावें, त्यांतून एकानेंही राहूंनये; आणि त्यां बरोबर कवच पांघरलेले हत्तीहि असावे, असीं पत्रें लिहून तुझ्या राज्याच्या सर्व नगरीं पाठीव. ही गोष्ट आनतिओखोस राजास बरी दिसून त्यानें आपल्या राज्याच्या सर्व नगरीं पत्रें पाठविलीं; त्यावरून सर्व लोकांचे व राज्याचे सरदार आले आणि त्यांबरोबर कवच पांघरलेले हत्तीहि आले. मग दुसऱ्या वेळीं दुष्ट बगरीस उठून येरुशालेमास आला आणि (नगराच्या) भिंती फोडून व दरवाजे मोडून पवित्र मंदिरांतहि त्यानें तेरा छिद्रें केलीं. आणि दगडहि फोडून त्यानें माती केली. तो आपल्या मनांत असें समजला कीं, यावेळीं ते मजवर (प्रबल होऊं) शकणार नाहीं; कारण माझें सैन्य मोठें असून माझा हात प्रबल आहे; आणि आकाशाचे देवाचे मनींहि असें

नाहीं. हें जेव्हां मतातयाचे पांच पुत्रांनीं ऐकिलें, तेव्हां ते उठून गिलआदांतील मिसपाहास आले; कारण शेमुएल भविष्यवाद्याचें दिवसांत तें आश्रमाचें ठिकाण होतें. आणि आकाशाची देवाचीं कृपा संपादन करण्यास त्यांनीं उपास केले, आणि भूमीवर बसले; तेव्हां त्यांस एक चांगला विचार सुचला. त्यामध्यें येहुदा ज्येष्ठ, दुसरा शिमाओन, तिसरा योहानान, चौथा योनाथान, पांचवा एलआझार. त्यांच्या बापानें त्यास आशीर्वाद देऊन असें म्हणाला कीं, हे माझा पुत्रा येहुदा, याकोबाचा पुत्र येहुदा जो सिंहासारिखा होता, त्यावरून जसी, तसी मी तुजवरून स्तुति करीन. हे माझ्या पुत्रा शिमओना, याकोबाचा पुत्र शिमओन, ज्यानें शेखेमाचे राहाणारे मारिले, यावरून जसी, तसी मी तुजवरून स्तुति करीन. हे माझ्यापुत्रा योहानाना, इस्राएलाचे सैन्याचा सरदार नेराचा पुत्र आबेनर यावरून जसी, तसी मी तुजवरून स्तुति करीन. हे माझ्या पुत्रा, योनाथाना, शाऊलाचा पुत्र योनाथान ज्यानें पेलिस्ती लोकांस मारिलें यावरून जसी, तसी मी तुजवरून स्तुति करीन. हे माझ्या पुत्रा एलआझारा, एलआझाराचा पुत्र पिनहास ज्यानें आपले देवाचा आवेश धरून इस्राएल लोकांस सोडविलें, यावरून जसी, तसी मी तुजवरून स्तुति करीन.

यावरून मतातयाचे पांच पुत्र त्याच दिवशीं निघून त्यांनीं त्या लोकांबरोबर लढाई करून त्यांतील पुष्कळांस मारिलें; परंतु यांतून येहुदाहि मारला गेला. येहुदा मारला गेला हें जेव्हां मतातयाचे पुत्रांनीं पाहिलें, तेव्हां ते परत आपल्या बापाकडे आले. तेव्हां तो त्यांस म्ह-

णाला, तुम्ही कां परतला? त्यांनीं उत्तर केलें कीं, आ-
म्हा सर्वांत जो चांगला तो आमचा भाऊ येहुदा मार-
ला गेला म्हणून (आह्मी परतलों). यावरून त्यांचा
बाप मतातया हा त्यांस उत्तर करून म्हणाला कीं, मी
तुम्हांबरोबर येऊन त्या लोकांशीं लढेन, नाहींतर कदा-
चित इस्राएलाचे घराण्याचा नाश होईल; आणि तुह्मी
तर आपल्या भावा करितां विस्मित झालां. मग मता-
तया आपल्या पुत्रांबरोबर निघाला, आणि त्यालोकांशीं
लढला. आकाशाच्या देवानेंहि त्या लोकांतील सर्व बळवा-
न त्यांच्या हातीं दिल्हे; आणि त्यांनीं तरवार चालिव-
णाऱ्यांचा, धनुर्धाऱ्यांचा, सैन्याच्या सरदारांचा व दुसरे
सरदारांचा मोठा वध केला; असा कीं यांतून कोणींच
वांचला नाहीं; आणि लोक समुद्रा कडील प्रांतांत पळून
गेले. एलआझार हा हत्ती मारण्याच्या कामांत गुंतला
होता; परंतु हत्ती त्याजवर पडून तो गडद झाला. त्या-
चे भाऊ परत येऊन त्याचा शोध केल्यावर तो त्यांस
हत्तीच्या खालीं गडद झालेला सांपडला. तरी इस्राएलाचे
पुत्रांचे हातीं त्यांचे शत्रू मिळाले, म्हणून त्यांनीं हर्ष के-
ला; आणि त्यांतून कित्येकांस जाळून, कित्येकांस तरवा-
रीने भोंसकून, कित्येकांस सुळावर फांशीं देऊन मारिलें.
आणि दुष्ट बगरीस जो आपल्या लोकांस वांकड्या
मार्गाकडे वळवीत असे, त्यासहि इस्राएलाचे घराण्यानें अ-
ग्नीनें ज़ाळिलें. याप्रमाणें दुष्ट बगरीस व त्याबरोबरचे
सैन्याचे सर्व सरदार मारले गेले. हें जेव्हां आनतिओ-
खोस राजानें ऐकिलें; तेव्हां तोहि एका तारवावर चढून
समुद्रा कडील प्रांतांकडे पळून गेला. परंतु जेथें जेथें

तो गेला तेथें तेथें त्यावर बंडावा होऊन (तेथील लोक) त्यास पळपुटा असें बोलूं लागले.

यानंतर हाशमोनायचे पुत्र पवित्र मंदिरांत आले, आणि त्यांनीं मोडके दरवाजे बांधिले, भोकें बंद केलीं आणि अगणित मुडद्यांनीं व अमंगळ पदार्थांनीं मंदिर विटाळलें होतें तें त्यांनीं शुद्ध केलें. मग (तेथील) समई पेटविण्याकरितां जाईताचें शुद्ध तेल ते शोधू लागले; परंतु त्यांस एक कुपि मात्र सांपडली. तिजवर मुख्य याजकाची मोहर केलेली होती, यावरून तें शुद्ध होतें असें त्यांस वाटलें. त्यांत एक दिवस जळेल एवढेंच मात्र (तेल) होतें; परंतु आकाशाचा देव ज्यानें आपलें नाव तेथें ठेविलें होतें, त्यानें त्यास आशीर्वाद दिल्यावरून त्याकडून आठ दिवस दिवे लागले.

यावरून हाशमोनायचा पुत्रांनीं असा ठराव केला आणि आपणा बरोबर सर्व इस्राएलांवरहि असा दृढ नियम केला कीं, आकाशाचे देवानें दिल्हेला जय प्रगट करण्या करितां शास्त्रांत लिहिलेल्या सना प्रमाणें हे आठदिवस आनंदाचे व हर्षाचे मानून त्यादिवशीं दिवे लावावे. आणि (या दिवसांत) शोक करूंनये आणि उपास किंवा दुःख ठरवूंनये; परंतु या गोष्टीमध्यें जें त्यांकरितां घडून आलें, त्यावरून त्यांनीं आपल्या देवाची प्रार्थना करावी. परंतु हाशमोनाय व त्यांचे पुत्र व त्याचे बंधू यांनीं, उद्योग करून काम करण्यास मना आहे असें कांहीं ठरविलें नाहीं. या वेळेपासून यावानांचे राज्याची कीर्ति वाढली नाहीं. तेव्हांपासून देवाचे मंदिराचा नाश होईपर्यंत म्हणजे दोनशें सहा वर्षं हाशमोनायच्या पुत्रां-

चा व त्याच्या पुत्रांच्या पुत्रांचा राज्याधिकार चालत होता. यावरून त्या दिवसापासून दासत्वांतहि इस्राएलाचें संतान हे दिवस, म्हणजे किसलेव (मार्गशीर्ष) महिन्याचे पंचवीसावे तारखे पासून आठ दिवस पाळून त्यांस आनंदाचे दिवस असें म्हणतात. आणि पवित्र मंदिराचे समयीं याजकांनीं, लेवीयानीं व ज्ञान्यांनी जें त्यांवर व त्यांच्या लेकरांच्या लेकरांवर ठरविलें आहे, तें कधींच उणें होणार नाहीं. ज्या देवानें त्यांकरितां आश्चर्य कर्म व अद्भुत चमत्कार केला, तो आपणाकरितांही आश्चर्य कर्में व अद्भुत चमत्कार करो; आणि " तुला मिसरांतून काढिलें त्यादिवसां प्रमाणें मी त्यास चमत्कार दाखवीन" हें वाक्य आपणावर पूर्ण होवो.

हानुक्याचे दिवसांत दिवे लावितांना

जी स्तुति करितात ती

येणें प्रमाणें

" ברוך אתה " हे परमेश्वरा, आमच्या देवा जगताच्या राजा, आम्हास हानुक्याचा दिवा लावण्यास आज्ञा देऊन पवित्र करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

" ברוך אתה " हे परमेश्वरा आमच्या देवा जगताच्या राजा, आमच्या पूर्वजां करितां त्या दिवसांत याच वेळीं अद्भुत कर्में करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

हें पहिल्या दिवशीं मात्र बोलतातः

" ברוך אתה " हे परमेश्वरा, आमच्या देवा जगताच्या राजा, आम्हास हा वेळपर्यंत जीवंत राखणाऱ्या, रक्षिणाऱ्या व पोहोंचविणाऱ्या, तूं धन्य आहेस.

הנרות הללו आमच्या पूर्वजांकरितां त्या दिवसांत याचवेळीं तुझ्या पवित्र याजकांच्या हातून जीं अद्भुत कर्मैं, जो उद्धार, जे पराक्रम, जें तारण, जे चमत्कार व जीं सांत्वनें तूं केलींस त्यां करितां आम्ही हे दिवे लावितों. हान्नुक्याचे हे सर्व आठ दिवस हे दिवे पवित्र आहेत; त्यांकडून कांहीं एक काम करण्यास आम्हास मोकळीक नाहीं; परंतु तुझ्या अद्भुत कर्मांवरून तारणांवरून, व चमत्कारांवरून तुझ्या नामाची स्तुति करावी एवढ्या करितां मात्र ते आहेत.

या तारणावरून प्रार्थनेंत जी

स्तुति करितात ती.

על הנסים आमच्या पूर्वजांकरितां त्या दिवसांत याच वेळीं जीं अद्भुत कर्मैं, जो उद्धार, जे पराक्रम, जें तारण, जे चमत्कार व जीं सांत्वनें तूं केलींस, म्हणजे योहानानाचा पुत्र मतातया मुख्य याजक जो हाशमोनाय, याच्या व त्याच्या पुत्रांच्या दिवसांत तुझे लोक इस्राएल यांस तुझ्या शास्त्राचा विसर पाडण्याकरितां आ-

णि तुझ्या प्रसन्नतेचे करार उलंघविण्याकरितां दुष्ट या-
वानाचा राज्याधिकार जेव्हां उठला होता; तेव्हां तूं आ-
पल्या परम दयेने त्यांच्या संकटसमयीं त्यासाठीं उभा
राहिलास, त्यांचा वाद तूं केलास, त्यांचा न्याय तूं निव-
डिलास, आणि त्यांचा सूड तूं उगवून अशक्तांच्या हातीं
बलवानांस, थोडक्यांच्या हातीं पुष्कळांस, सात्विकांच्या
हातीं दुष्टांस, शुद्धांच्या हातीं अशुद्धांस, आणि तुझ्या
शास्त्राचा अभ्यास करणाऱ्यांच्या हातीं गर्विष्ठांस सोंपून
दिल्हेंस. आणि तूं आपणाकरितां मोठी व पवित्र कीर्त्ति
करून, केवळ आजच असें तूं आपले लोक इस्राएल यां-
चें मोठें तारण व उद्धार केलास. यानंतर तुझ्या लेकरां-
नीं तुझ्या पवित्र देवळांत येऊन तुझें मंदिर स्वच्छ केलें,
तुझें पवित्र स्थान शुद्ध केलें, तुझ्या पवित्र अंगणांत दिवे
लाविले, आणि हे आठ दिवस स्तुतीचे आणि कीर्त्तनाचे
ठरविले; याप्रमाणें अद्भुत कर्मे व चमत्कार तूं केलेस, म्ह-
णून आम्ही तुझ्या मोठ्या नामास स्तवितों. सेलाह.

תם ונשלם שבח לאל בורא עולם

पृथ्वी उत्पन्न कर्त्या देवाची स्तुति परिपूर्ण व अखंडित
असो.

इस्राएल लोकांच्या सद्गुणशोधक मंडळीनें छापविलेलीं पुस्तकें.

प्रायश्चित्ताच्या दिवशीं पापाविषयीं कबूल होणें. ” १ ३

पापाच्या क्षमेसाठीं प्रार्थना .. .. ” ८ ”

इस्राएलांचा लग्नविधि .. .. ” ३ ”

वर्षप्रतिपदेची प्रार्थना. .. .. ” १ ”

नवसांची सुटका व समुद्रतीरीं करायाची प्रार्थना .. .. ” ४ ”

आनतिओखोस राजाचा इतिहास अथवा हान्नुक्याचे सनाची स्थापना .. .. .. ” २ ”

इब्री पहिलें पुस्तक छापायास दिल्हें आहे. ..
